Dr. B. M. Hirdekar
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-** 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/12-13/2024 DATE :7-Aug-13 at 4:51:33 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था,

संदर्भ : पर्यावरण अभ्यास या द्वितीय वर्षाच्या सक्तीच्या पेपरबाबत...

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, मार्च/एपिल-१३ मध्ये झालेल्या द्वितीय वर्षाच्या पर्यावरण अभ्यास या सक्तीच्या पेपरमध्ये अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असल्याचे पालक व विद्यार्थी आणि प्राचार्य यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर बाब अधिकार मंडळापुढे ठेवण्यात आली व त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

- द्वितीय वर्षाच्या पर्यावरण अभ्यास या सक्तीच्या पेपरमध्ये थेअरी व प्रोजेक्ट व व्हायवा असे तीन स्वतंत्र कॉंपोनंट आहेत व त्याचे पासिंग हेडही स्वतंत्र होते. सध्या निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेता सदर पासिंग हेड एकत्र करण्यात आली असून १०० पैकी ४० गुण ज्या विद्यार्थ्यांना प्राप्त झाले आहेत, त्यांना सुधारित श्रेणी सी देण्यात येणार आहे.
- मात्र जे विद्यार्थी थेअरी व प्रोजेक्ट व व्हायवा यापैकी कोणत्याही हेडला गैरहजर किंवा प्राप्त झालेले गुण शून्य असतील तर असे विद्यार्थी अनुत्तीर्ण म्हणजेच सी ग्रेडसाठी अपात्र ठरतील.
- सुधारित श्रेणीचे मार्कलिस्ट स्वतंत्रपणे देण्यात येणार नाही. सध्या त्यांची यादी व लेजरपान त्या त्या महाविद्यालयाकडे पाठविण्यात येईल.
- ऑक्टोबर-१३ मध्ये होणा-या परीक्षेच्या मार्कलिस्टमध्ये सदर सुधारित श्रेणी दर्शविण्यात येईल.
- अंतीम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांची वर उल्लेख केल्याप्रमाणे श्रेणी सुधारित होईल त्यांचा तपशील परस्पर पदवीदान विभागाकडे कळविला जाईल. जेणेकरून त्यांची पदवी त्यांना देता येईल.
- सदरचे बदल सर्व विद्याशाखांमधील द्वितीय वर्षाच्या पर्यावरण अभ्यास या सक्तीच्या पेपरसाठी लागू राहतील.

तरी वरील बाबी सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात व सोबतच्या नमुन्यात अशा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी त्या त्या परीक्षा विभागास सत्वर कळवावी.

कळावे,

आपला विश्वासू,

डॉ. बी.एम. हिर्डेकर
परीक्षा नियंत्रक

प्रत :-

- मध्यवर्ती मूल्यमापन विभागास,
- परीक्षक नियुक्ती विभागास,
- संगणक केंद्र विभागास,
- परीक्षा गोदाम पडताळणी विभागास,
- सर्व परीक्षा विभागप्रमुखांना

PROFORMA

# द्वितीय वर्षाच्या सक्तिचा पर्यावरण अभ्यास या विषयात अनुत्तीर्ण (सी ग्रेड न मिळालेल्या) असलेल्या विद्यार्थ्यांचा तपशील

महाविद्यालयाचे नांव :

परीक्षा :

| अ.क्र. | बैठक क्रमांक | पीआरएन नंबर | विद्यार्थ्याचे नांव | लेखी परीक्षेस हजर होते काय? | प्रोजेक्ट सादर केला आहे काय? किती गुण आहेत? | व्हायवाला हजर होते काय? किती गुण आहेत? |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्यांची सही व शिक्का